# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः26.06.2025** **वारःगुरुवार**

---

1. संविधान हत्या दिनानिमित्त देशभर विविध कार्यक्रम, राज्यातल्या विविध जिल्ह्यांमधे आणीबाणीविरुद्ध लढलेल्या नागरिकांचा सन्मान
2. पुणे मेट्रोच्या विस्ताराला केंद्रिय मंत्रीमंडळाची मंजुरी
3. ऍक्सिओम 4 अंतराळ मोहीमेची यशस्वी सुरुवात आणि
4. "महाराष्ट्र उद्योग संवाद 2025" परिसंवादाचं मुंबईत राज्यपालांच्या उपस्थितीत उद्घाटन

**संविधान हत्यादिन**

25 जून 1975 रोजी देशात आणीबाणी जाहीर झाली. या घटनेला काल 50 वर्ष पूर्ण झाली. राज्यघटनेची पायमल्ली करणाऱ्या या दिवसाच्या स्मरणार्थ काल देशभरात संविधान हत्या दिवस पाळण्यात आला. आणीबाणीच्या 21 महिन्यांच्या काळात जनतेचे मूलभूत अधिकार काढून घेण्यात आले, नागरिकांना तुरुंगात डांबण्याचे प्रकार वाढले तसंच प्रसार माध्यमांवरही निर्बंध लादण्यात आले. घटनेत सुधारणा करुन अनेक संस्थांचे अधिकारही काढून घेण्यात आले. आणीबाणीतील अत्याचारांना बळी पडलेल्या सर्व व्यक्तींना काल देशभरात श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. केंद्रिय मंत्रीमंडळाच्या बैठकीतही दोन मिनिटांचं मौन पाळून आणीबाणीतल्या योद्ध्यांना आदरांजली वाहण्यात आली.

संविधान हत्या दिनानिमित्त राज्यात मुंबईतल्या राजभवनात आयोजित केलेल्या कार्यक्रमाला राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राज्य मंत्रीमंडळातील अन्य मंत्री उपस्थित होते. आणीबाणीच्या काळात लोकशाहीच्या रक्षणासाठी लढलेल्या लोकांमुळेच भारतातली लोकशाही टिकून राहिल्याचं मत राज्यपालांनी यावेळी व्यक्त केलं. या कार्यक्रमात आणीबाणीच्या वेळी लढलेल्या नागरिकांचा सन्मान करण्यात आला.

पुण्यासह सांगली, अहिल्यानगर, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, नाशिक, पालघर आणि बीड, धुळे, हिंगोली, नंदूरबार, नांदेड या जिल्ह्यांच्या ठिकाणीही आणीबाणीच्या लढवय्यांना मुख्यमंत्र्यांच्या स्वाक्षरीचं सन्मानपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. पुणे जिल्हाधिकारी कार्यालयानं आणीबाणीविषयक विशेष प्रदर्शन आयोजित केलं आहे. या प्रदर्शनाचं उद्घाटन जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या हस्ते झालं. हे प्रदर्शन 25 जुलैपर्यंत नागरिकांना पाहता येईल.

सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सांगली, नवी मुंबई, अहिल्या नगर, पालघर, जळगाव, हिंगोली, धुळे या जिल्ह्यातही आणीबाणीविषयक प्रदर्शन भरवण्यात आलं आहे. रत्नागिरी इथं संविधान उद्देशिकेचं सामूहिक

वाचन करण्यात आलं. पालघरमध्ये आणीबाणीविषयीच्या जनजागृतीसाठी शालेय विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा तसंच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी चर्चासत्रं आयोजित करण्यात आली होती.

**केंद्रिय मंत्रीमंडळ**

पुणे मेट्रोच्या दुसऱ्या टप्प्यातील विस्ताराला केंद्रिय मंत्रीमंडळानं मान्यता दिली आहे. केंद्रिय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मंत्रीमंडळाच्या बैठकीनंतर काल माध्यमांना ही माहिती दिली. टप्पा-2 अंतर्गत वनाझ ते चांदणी चौक आणि रामवाडी ते वाघोली/विठ्ठलवाडी हे प्रकल्प टप्पा -1 मधील विद्यमान वनाझ - रामवाडी मार्गिकेचा विस्तार असतील. त्यांची लांबी थोडंकमी तेरा किलोमीटर आणि त्यावर 13 स्थानकं असतील. याविषयी अधिक माहिती देताना पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ म्हणाले....

**पुण्याचे पूर्व आणि पश्चिम टोप हे अजून मोठ्या स्वरूपामध्ये या मेट्रोच्या मार्गाने जोडलं जाईल. एकूण जवळपास बारा पॉइंट पंच्याहत्तर किलोमीटर या मेट्रो मार्गाला आज मान्यता देण्यात आली, त्याच्यामध्ये तेरा स्टेशन्स असतील आणि जवळपास तीन हजार तीनशे सव्वीस कोटी रुपये या मेट्रो मार्गाला आता खर्च येईल. महामेट्रोच्या माध्यमातून हा प्रकल्प पूर्ण होईल त्यात पीआयबीची मान्यता आपल्याला हवी असलेला मार्ग म्हणजे खडकवासला ते खराडी तोही मार्ग लवकरात लवकर त्याची मान्यता पीआयबीची मिळेल असा प्रयत्न राहणार आहे. त्यामुळे पुणेकरांसाठी खूप महत्त्वाची गोष्ट आहे.**

**ॲक्सिओम**

भारतीय अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांचा सहभाग असलेली ॲक्सिओम 4 ही अंतराळ मोहीम काल सुरू झाली. अमेरिकेतील फ्लोरिडा अंतरिक्ष स्थानकावरुन या मोहीमेच्या यानाचं यशस्वी प्रक्षेपण करण्यात आलं. अमेरिकेचे अंतराळवीर पेगी व्हिटसन यांच्या नेतृत्वातील या मोहीमेत भारतीय वायु दलातील ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांच्यासह हंगेरी आणि पोलंडचे अंतराळवीर सहभागी झाले आहेत.

माझ्या खांद्यावरील तिरंग्यामुळे सर्व भारतीय माझ्यासोबत असल्याची माझी भावना आहे. हा केवळ अंतराळ स्थानकाचा प्रवास नसून भारताच्या मानवी अंतराळ कार्यक्रमाचा प्रारंभ आहे, असं ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांनी अंतराळातून पाठवलेल्या संदेशात म्हटलं आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या अंतराळ मोहीमेसाठी शुक्ला यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

भारतीय प्रमाण वेळेनुसार आज दुपारी साडेचार वाजता त्यांचं अंतराळ यान आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकासोबत जोडलं जाईल अशी माहिती इस्रोनं दिली आहे. आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकात राहून हे अंतराळवीर इस्रोच्या महत्त्वाच्या संशोधन प्रकल्पांसह एकंदर 60 शास्त्रीय अभ्यास प्रकल्पांवर काम करतील.

**उद्योग संवाद कार्यक्रम**

जगाच्या अनेक भागांत सध्या युद्ध आणि संघर्षाचं सावट आहे, मात्र महाराष्ट्रात आपण औद्योगिक वाढ आणि आर्थिक प्रगतीवर संवाद करत आहोत, ही अत्यंत प्रशंसनीय बाब आहे, असं प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळानं आयोजित केलेल्या "महाराष्ट्र उद्योग संवाद 2025" या परिसंवादाचं उद्घाटन काल मुंबईत राज्यपालांच्या उपस्थितीत झालं, त्यावेळी ते बोलत होते.

उद्योग सुलभता, नावीन्य, आणि सर्वसामान्यांच्या सहभागातून आपण विकसित महाराष्ट्राचं लक्ष्य गाठू शकतो, असा विश्वास राज्यपालांनी व्यक्त केला.

महाराष्ट्राची खरी ताकद म्हणजे इथल्या उद्योजकांची मानसिकता आणि मेहनत आहे. आकडेवारी केवळ एक पैलू आहे, पण ही राज्याची वाटचाल घडवणारे तुम्हीच आहात, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उद्घाटनप्रसंगी उपस्थित उद्योजकांचा गौरव केला. महाराष्ट्र हे देशाला औद्योगिक प्रेरणा देणारं बलशाली राज्य आहे. राज्यानं गेल्या काही वर्षांत अनेक विक्रमी सामंजस्य करार केले असून त्यांचं प्रत्यक्षात रूपांतरही देशात सर्वाधिक झालं आहे, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. राज्य सरकारनं जिल्हा उद्योग परिषद, मैत्री पोर्टल, आणि कौशल्य विकास केंद्र अशा उपक्रमांद्वारे जिल्हा स्तरावर उद्योगवाढीचा पाया भक्कम केल्याचं उद्योग मंत्री उदय सामंत यांनी सांगितलं.

**<u>अंमली पदार्थ विरोधीदिन</u>**

आज जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन आहे. अंमली पदार्थ मुक्तीसाठी पुणे पोलिस करत असलेल्या उपाययोजनांची आकाशवाणीला माहिती देताना गुन्हे शाखेचे अतिरिक्त आयुक्त पंकज देशमुख म्हणाले...

**अंमली पदार्थांची तस्करी करणाऱ्यांवर ठोस अशा स्वरूपाची कायदेशीर कारवाई करणे हे सुद्धा आम्ही तितक्याच नित्यनियमाने करीत आहे सर्व नागरिकांना एवढंच आवाहन करील कुठल्याही प्रकारच्या अंमली पदार्थाच्या आहारी कुणी जाऊ नये, आणि तसा आपल्या शेजारी बाजारी आपल्या ओळखीच्या कोणाच्या निदर्शनास येत असेल तर त्याकडे विक्टम म्हणून बघावं आणि त्यांना कुठल्या, तरी आजार झाला आहे. आणि त्याच्यातनं त्याची ट्रीटमेंट कशी करता येईल त्यांना रिहॅबिलिटेशन त्यांचं कसं करता येईल ह्याच्यासाठी प्रयत्न करावेत हे करत असताना जर कोणी अंमली पदार्थाची तस्करी करताना विकताना असं जर आपल्या निदर्शनास येत असेल तर एकशे बारा नंबरवर पोलिसांना त्याच्याबद्दल माहिती द्यावी सायबरची आमची हेल्पलाईन पण आहे एनडीपीएसची हेल्पलाईन आहे तिथे सुद्धा कळवावे.**

**<u>आराखडा-कोल्हापूर</u>**

कोल्हापूर जिल्ह्याला 42 हजार 200 कोटींच्या वार्षिक पतपुरवठा आराखड्याचं उद्दिष्ट देण्यात आलं असून खरीप हंगामासाठी पीक कर्जाची जुलैअखेर 100 टक्के उद्दिष्टपूर्ती करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी काल जिल्हास्तरीय सल्लागार आणि आढावा समितीची बैठकीत दिल्या. शासनाच्या महत्वाकांक्षी योजनेमध्ये प्रत्येक गावामध्ये किमान एक लाभार्थ्याला लाभ देण्याची सूचना त्यांनी महामंडळ आणि बँकांना दिली.

**<u>राजर्षि शाहू जयंती-कोल्हापूर, सातारा</u>**

राजर्षि छत्रपती शाहू महाराजांची 151 वी जयंती आज राज्यात साजरी केली जाणार आहे. यानिमित्त कोल्हापूर जिल्ह्यात आजपासून 10 जुलैपर्यंत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. आज जिल्ह्यातल्या सर्व शासकीय, निम शासकीय कार्यालयांत, शैक्षणिक संस्थांमध्ये शाहू महाराजांच्या प्रतिमेचं पूजन, कार्याचा गुणगौरव आणि त्यांनी जनहितार्थ घेतलेल्या महत्वाच्या निर्णयांचं तसंच जाहीररनाम्याचं

सामुदायिक वाचन केलं जाणार आहे. सामाजिक न्याय विभागातर्फे समता दिंडीचंही आयोजन करण्यात आलं आहे. सातारा, पुणे जिल्ह्यासह राज्यातल्या अन्य जिल्ह्यातही राजर्षि छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीनिमित्त समता दिंडी काढण्यात येणार आहे.

**पेरण्या लांबल्या-अकोला**

अकोला जिल्ह्यात अद्याप पेरणीलायक पाऊस झाला नसल्यानं पेरण्या खोळंबल्या आहेत. त्यामुळं शेतीची कामं सुरू झालेली नाहीत आणि शेतमजुरांच्या हाताला काम नाही. अशा परिस्थितीत शेतमजुरांना उदरनिर्वाहासाठी रोजगार हमी योजनेच्या कामाचा आधार मिळत आहे.

**वाशिम-पाऊस**

वाशिम जिल्ह्यात काल संध्याकाळपासून सर्वच तालुक्यांमध्ये या मोसमात प्रथमच सर्वदूर पाऊस पडत असून शेतकऱ्यांसह संपूर्ण जिल्हावासियांना दिलासा मिळाला आहे. खोळंबलेल्या पेरण्यांना पुन्हा सुरुवात होणार असून यापूर्वी झालेल्या पेरणीला हा पाऊस पूरक आहे.

**पाऊस पाणी**

सातारा जिल्ह्यात वीर धरणाच्या पाणलोट क्षेत्रामध्ये सुरू असलेल्या जोरदार पावसामुळं धरणाची पाणीपातळी नियंत्रित करण्यासाठी नीरा नदी पात्रात पाणी सोडण्यात येत आहे. कोल्हापूर जिल्ह्यात राधानगरी तालुक्यातील पाटपन्हाळा इथं पावसामुळं डोंगर उतारावरची माती सरकण्यास सुरुवात झाल्यानंतर डोंगरापासून दोनशे मीटर अंतरावरच्या शाळेतील वर्ग सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहेत. रत्नागिरी जिल्ह्यात जगबुडी नदी इशारा पातळीवर वाहात असल्यामुळं नागरिकांना सतर्कतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**हवामान इशारा**

पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी जिल्ह्यात तसंच नाशिक, पुणे, सातारा, कोल्हापूर जिल्ह्याच्या घाट परिसरात मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.